अनाथ आरक्षण धोरणामध्ये बदल करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**महिला व बाल विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांक- अनाथ-२०२२/प्र.क्र.१२२/का-०३**
नविन प्रशासन भवन, तिसरा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक- ६ एप्रिल, २०२३.

**वाचा :-**

१) शासन निर्णय, महिला व बाल विकास विभाग, क्र.संकीर्ण-२०१३/प्र.क्र.१०९/का.०३, दि.०६.०६.२०१६.
२) शासन शुध्दीपत्रक, महिला व बाल विकास विभाग क्र.संकीर्ण-२०१३/प्र.क्र.१०९/का-३, दिनांक ९.५.२०१८.
३) शासन निर्णय, महिला व बाल विकास विभाग, क्र.अमुजा-२०११/प्र.क्र.२१२/का.०३, दि.०२.०४.२०१८.
४) शासन परिपत्रक, महिला व बाल विकास विभाग क्रमांक-अनाथ-२०१८/प्र.क्र.१८२/का.०३, दि.२०.८.२०१९.
५) शासन निर्णय, महिला व बाल विकास विभाग, क्र. अनाथ-२०१८/प्र.क्र.१८२/का-०३, दि.२३ .०८.२०२१
६) शासन शुध्दीपत्रक महिला व बाल विकास विभाग क्र. अनाथ-२०१८/प्र.क्र.१८२/का-०३, दिनांक २६.११.२०२१.
७) दिनांक २३.०३.२०२३ रोजी आयोजित मा. मंत्रीमंडळाच्या बैठकीचे इतिवृत्त.

**प्रस्तावना :-**

अनाथ मुलांना राज्य शासनाच्या विविध सवलतींचा लाभ घेता यावा, याकरीता दि. १७/०१/२०१८ रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीतील निर्णयानुसार शासन निर्णय, महिला व बाल विकास विभाग, दि.२/४/२०१८ अन्वये अनाथ मुलांना सर्वप्रथम खुल्या प्रवर्गातून शिक्षण व नोकरी यामध्ये १ टक्का समांतर आरक्षण लागू करण्यात आले. व अनाथ आरक्षणाच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने मार्गदर्शक सूचना महिला व बाल विकास विभाग, शासन परिपत्रक दि. २०/०८/२०१९ अन्वये निर्गमित कऱण्यात आल्या.

अनाथ आरक्षणाबाबतच्या दि. २/०४/२०१८ च्या शासन निर्णयात नमूद व्याख्येत बदल करणे तसेच अनाथांची तीन प्रकारांमध्ये वर्गवारी करणे तसेच अनाथांना खुल्या प्रवर्गातून १ टक्का आरक्षण लागू करण्याऐवजी दिव्यांगांच्या धर्तीवर उपलब्ध पद संख्येच्या १ टक्का आरक्षण लागू करणे याबाबतचा प्रस्ताव मा. मंत्रिमंडळाच्या मान्यतेस्तव सादर करण्यात आला. दि. ११/०८/२०२१ रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीतील निर्णयानुसार अनाथांना दिव्यांगांच्या धर्तीवर १ टक्के आरक्षण लागू करणे, अनाथांच्या व्याख्येमध्ये बदल करणे, अनाथांची तीन प्रकारामध्ये वर्गवारी करणे, अनाथ प्रमाणपत्र नमून्यात बदल करणे यानुषंगाने अनाथ आरक्षणासंदर्भातील सर्व शासन निर्णय अधिक्रमित करुन दिनांक २३ ऑगस्ट, २०२१ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

या शासन निर्णयातील अनाथांच्या कोणत्याही प्रवर्गावर अन्याय होणार नाही तसेच सर्व प्रवर्गांना समान संधी उपलब्ध व्हावी याकरिता सध्या उपलब्ध असलेल्या १ टक्का आरक्षणाच्या मर्यादेतच अनाथांच्या प्रवर्गांमध्ये

आरक्षित पदांची विभागणी करण्याबाबत दि. २३.०३.२०२३ रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीतील निर्णयानुसार पुढील शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

**शासन निर्णय :-**

अनाथ आरक्षण धोरणामध्ये बदल करण्यासाठी वाचा क्र.५ येथील शासन निर्णय तसेच वाचा क्र.६ येथील शासन शुध्दिपत्रक अधिक्रमित करून हा शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

अनाथांना दिव्यांगांच्या धर्तीवर शिक्षण व शासकीय (निमशासकीय तसेच शासन अनुदानित संस्थांमधील) पद भरतीमध्ये उपलब्ध पदांच्या १ टक्का इतके आरक्षण लागू करण्यास मान्यता देण्यात येत आहे. या आरक्षणासाठी पात्रतेचे निकष, आरक्षणाचे स्वरुप, अटी व शर्ती, आरक्षणाच्या अंमलबजावणीसाठी मार्गदर्शक सूचना, अनाथांसाठी प्रमाणपत्र निर्गमित करावयाची कार्यपध्दती तसेच अनाथ प्रमाणपत्राचा नमुना पुढीलप्रमाणे विहित करण्यात येत आहेत.

**१. अनाथ आरक्षण पात्रता निकष**

१) "संस्थात्मक" या प्रवर्गामध्ये ज्यांच्या वयाची १८ वर्षे पूर्ण होण्यापूर्वी त्यांच्या आई वडीलांचे निधन झाले आहे व ज्यांचे शासन मान्यता प्राप्त संस्थांमध्ये पालन पोषण झाले आहे (त्यांच्या नातेवाईकाची अथवा जातीची माहिती उपलब्ध असो किंवा नसो) अशा बालकांचा समावेश असेल.

(महिला व बाल विकास विभागांतर्गत बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनिय,२०१५ अन्वये कार्यरत बालकांच्या काळजी व संरक्षणाशी संबंधित संस्थांमध्ये तसेच महिला व बाल विकास विभागाव्यतिरिक्त अन्य विभागांकडून मान्यता प्रदान करण्यात आलेल्या अनाथालये अथवा तत्सद्दश संस्थांमध्ये पालन पोषण झालेल्या अनाथांचा यामध्ये समावेश असेल.)

२) "संस्थाबाह्य" या प्रवर्गामध्ये ज्यांच्या वयाची १८ वर्षे पूर्ण होण्यापूर्वी त्यांच्या आई वडीलांचे निधन झाले आहे आणि ज्यांचे शासन मान्यताप्राप्त संस्थांबाहेर/नातेवाईकाकडे संगोपन झालेले आहे अशा बालकांचा समावेश असेल.

**२. आरक्षणाचे स्वरुप**

१) अनाथ आरक्षणाची अंमलबजावणी दिव्यांग आरक्षणाच्या धर्तीवर करण्यात येईल.

२) सदर आरक्षण तसेच शैक्षणिक संस्था वसतिगृहे व व्यावसायिक शिक्षण प्रवेशासाठी आणि शासकीय पदभरतीसाठी लागू राहील.

३) अनाथांसाठी आरक्षित पदे ही पदभरतीसाठी उपलब्ध एकूण पदसंख्येच्या तसेच शैक्षणिक प्रवेशासाठी उपलब्ध एकूण जागांच्या १% इतकी असतील.

४) अनाथांसाठी आरक्षित पदांची विभागणी संस्थात्मक व संस्थाबाह्य या प्रवर्गांमध्ये पुढीलप्रमाणे करण्यात येईलः

I. शिक्षण व नोकरीमध्ये अनाथ प्रवर्गासाठी उपलब्ध जागा समसंख्येत असल्यास संस्थात्मक व संस्थाबाह्य प्रवर्गास समप्रमाणात जागा वाटून देण्यात याव्यात.

II. अनाथ आरक्षण प्रवर्गासाठी उपलब्ध जागा विषम संख्येत असल्यास आधी जागांची समप्रमाणात विभागणी करावी व उरलेले अधिकचे १ पद हे पहिल्या पदभरतीमध्ये संस्थात्मक प्रवर्गासाठी उपलब्ध करुन द्यावे. व त्यापुढील पदभरतीमध्येसुध्दा विषम जागा उपलब्ध असतील तर उपरोक्तप्रमाणे जागांची सम-समान विभागणी केल्यावर उरलेले अधिकचे १ पद हे त्या पदभरतीमध्ये संस्थाबाह्य

प्रवर्गासाठी उपलब्ध करुन देण्यात यावे. अशा प्रकारे अधिकचे पद आळीपाळीने संस्थात्मक व संस्थाबाह्य प्रवर्गांसाठी उपलब्ध करुन देण्यात यावे.

III. तथापि, एका वर्षी विषम संख्येत पदे उपलब्ध झाली व त्यानंतरच्या पुढील पदभरतीमध्ये समप्रमाणात पदे उपलब्ध झाल्यास पुढील प्रमाणे कार्यवाही करावी-

- पहिल्या भरती प्रक्रियेमध्ये तीन पदे उपलब्ध झाल्यास दोन पदे संस्थात्मक व एक पद संस्थाबाह्य उमेदवारांना उपलब्ध होतील.
- पुढील भरतीप्रक्रियेमध्ये दोन पदे उपलब्ध झाल्यास दोन्ही प्रवर्गांना एक-एक पद उपलब्ध होईल.
- त्या पुढील भरतीप्रक्रियेमध्ये पुन्हा तीन पदे उपलब्ध झाल्यास एक पद संस्थात्मक व दोन पदे संस्थाबाह्य उमेदवारांना उपलब्ध होतील.

## ३. अटी व शर्ती

१) आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी उमेदवारा०कडे महिला व बाल विकास विभागाकडून निर्गमित अनाथ प्रमाणपत्र असणे आवश्यक असेल.

२) अनाथ आरक्षणासाठी अर्ज करणा-या उमेदवाराने तो महाराष्ट्र राज्याचा अधिवासी (Domicile) असल्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असेल.

३) पदभरतीमध्ये अनाथ आरक्षणासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवाराने संबंधित पदाच्या सेवा प्रवेश नियमातील तरतूदीनुसार पदासाठी आवश्यक असणारी किमान शैक्षणिक व इतर अर्हता प्राप्त केलेली असणे बंधनकारक राहील.

४) अनाथ आरक्षणाचा लाभ घेऊन शासन सेवेत रूजू होणाऱ्या उमेदवाराला अनाथ प्रमाणपत्र पडताळणीच्या अधीन राहून तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती देण्यात येईल. नियुक्ती पश्चात ६ महिन्याच्या कालावधीत आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे यांचेकडून अनाथ प्रमाणपत्राची पडताळणी करुन घेण्याची जबाबदारी संबंधित नियुक्ती प्राधिकारी/ विभाग प्रमुख यांची राहील.

५) अनाथ आरक्षण लागू करताना शासन निर्णयातील तरतूदींचे काटेकोरपणे पालन करण्याची जबाबदारी संबंधीत प्राधिकरणाची राहील.

६) अनाथ आरक्षणाच्या अनुषंगाने अभिनिर्णय देण्यास महिला व बाल विकास विभाग सक्षम राहील.

७) अनाथ आरक्षण हे समांतर आरक्षण असल्याने आरक्षणाच्या अनुषंगाने सामान्य प्रशासन विभागाने वेळोवेळी निश्चित केलेले निकष व अटी अनाथ आरक्षणास लागू राहतील.

## ४. आरक्षणाच्या अंमलबजावणीसाठी मार्गदर्शक सूचना

१) अनाथांसाठी आरक्षित पदांची गणना करताना १०० पदांमध्ये १ पद असे प्रमाण असले तरी उपलब्ध पदसंख्येच्या १%ची गणना केल्यावर संख्या अपूर्णांकात येत असल्यास ०.५० पेक्षा कमी येणारा अपूर्णांक दुर्लक्षित करावा तर ०.५० किंवा त्यापेक्षा मोठा अपूर्णांक १ समजावा.

२) पदभरती अथवा शैक्षणिक प्रवेशासाठीची अनाथ आरक्षणाची पदे उपलब्ध पदसंख्येच्या प्रमाणात स्वतंत्रपणे दर्शविण्यात यावीत. ही पदे खुला किंवा सामाजिक आरक्षण प्रवर्गात दर्शविण्यात येऊ नयेत.

३) तथापि, अनाथांसाठी आरक्षित पदावर गुणवत्तेनुसार निवड झाल्यावर संबंधित अनाथ उमेदवाराचा समावेश तो ज्या सामाजिक प्रवर्गाचा आहे त्या प्रवर्गात करण्यात येईल. आणि त्याच्या सामाजिक प्रवर्गाच्या बिंदूवर त्याची गणना करण्यात येईल.

४) बालगृहात/अनाथालयात दाखल करण्यात येणाऱ्या काही अनाथ बालकांच्या शैक्षणिक प्रवेशावेळी त्यांची जात अंदाजे नमूद करण्यात येते. अशा अनाथांच्या जात प्रमाणपत्राची वैधता होऊ शकत नसल्यास सदर उमेदवाराचा समावेश पदभरतीनंतर खुल्या प्रवर्गात करण्यात यावा.

५) सदर शासन निर्णय अंमलात येण्यापूर्वी ज्या पात्र अनाथांना महिला व बाल विकास विभागामार्फत अनाथ प्रमाणपत्र निर्गमित करण्यात आलेले आहे त्यातील "अ" व "ब" प्रवर्गाचे अनाथ प्रमाणपत्रप्राप्त अनाथांना या शासन निर्णयानुसार "संस्थात्मक" प्रवर्गातील अनाथ समजण्यात येईल. व पूर्वीच्या "क" प्रवर्गाचे प्रमाणपत्र निर्गमित करण्यात आलेल्या अनाथांना या शासन निर्णयानुसार "संस्थाबाह्य" प्रवर्गातील अनाथ समजण्यात येईल. त्यांना सुधारीत प्रमाणपत्रे वेगळ्याने निर्गमित करण्याची आवश्यकता नाही. हा शासन निर्णय लागू झाल्याच्या दिनांकापासून नव्याने विहीत नमुन्यानुसार प्रमाणपत्रे वितरीत करण्यात यावीत.

६) अनाथ आरक्षणासाठी अर्ज करणा-या उमेदवारास अनूसूचित जाती या प्रवर्गासाठी निश्चित करण्यात आलेले शैक्षणिक शुल्क, परीक्षा शुल्क, किमान गुणवत्ता पात्रता आणि वयोमर्यादा इत्यादी निकष लागू राहतील.

**५. "संस्थात्मक" प्रवर्गातील अनाथांसाठी प्रमाणपत्र निर्गमित करावयाची कार्यपध्दती**

१) महिला व बालविकास विभागाच्या अखत्यारीत येणा-या बालकांशी संबंधित संस्थांमध्ये वास्तव्यास असलेल्या किंवा वयाच्या १८ वर्षानंतर संस्थेतून बाहेर पडलेल्या व अनाथ प्रमाणपत्रासाठीचे निकष पूर्ण करणा-या अनाथाने संबंधित संस्थेच्या अधीक्षकाकडे अनाथ प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज करावा.

२) संबंधित संस्थेच्या अधीक्षकांनी त्या अर्जावरून संबंधित अर्जदाराने ज्या-ज्या संस्थेत वास्तव्य केले आहे अशा सर्व संबंधित संस्थेच्या अधीक्षकांकडून आवश्यकतेनुसार त्याची माहिती स्वतः उपलब्ध करुन घ्यावी. तसेच अर्जदाराच्या आई-वडीलांचा शोध घेवून, त्यापैकी कोणीही हयात नसल्याबाबतची संबंधित यंत्रणेकडून खात्री करुन घ्यावी.

३) संस्थेच्या अधीक्षकांनी अर्जदाराच्या आई-वडीलांचा शोध घेवून, त्यापैकी कोणीही हयात नसल्याबाबतची संबंधित यंत्रणेकडून खात्री केली असल्याचे तसेच संबंधित अर्जदाराची माहिती व उपलब्ध कागदपत्रांच्या आधारे निकषानुसार तो अनाथ असल्याचे नमूद करून जिल्हा महिला बाल विकास अधिकारी यांना प्रस्ताव सादर करावा.

४) जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांनी संस्थेच्या अधीक्षकांकडून प्राप्त प्रस्तावाची छाननी पुढील दस्तावेज/पुरावे विचारात घेऊन करावी - संस्थेचे अधीक्षक यांनी सादर केलेली माहिती, जन्म-मृत्यू नोंद रजिस्टर, ग्रामसेवक/मुख्याधिकारी/वार्ड अधिकारी किंवा इतर सक्षम अधिकारी यांचेकडून निर्गमित मृत्यू दाखला, आवश्यकतेनुसार शासकीय जिल्हा रुग्णालयाकडून प्राप्त वयाचा पुरावा, शाळा सोडल्याचा दाखला, प्रवेश निर्गम रजिस्टरची प्रत, गृह चौकशी अहवाल, बाल कल्याण समिती/बाल न्याय मंडळाचे संबंधिताबाबतचे आधीचे आदेश इत्यादी.

५) या छाननीनंतर जिल्हा महिला बाल विकास अधिकारी यांनी संबंधित अर्जदारास अनाथ घोषित करण्यासाठीचा प्रस्ताव स्वयंस्पष्ट अभिप्रायासह संबंधित जिल्ह्याच्या बाल कल्याण समितीस सादर करावा.

६) बाल कल्याण समितीने जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांचेकडून प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर अर्जाची पुन्हा छाननी करावी. आवश्यकता असेल तर अर्जाच्या छाननीसाठी अर्जदाराची मुलाखत किंवा पोलीस / महसूल विभागाच्या यंत्रणेचे सहाय्य घ्यावे.

७) बालगृहात/अनाथालयात दाखल करण्यात येणाऱ्या काही अनाथ बालकांची जन्म तारीख/वय अंदाजे नमूद करण्यात येते. सक्षम प्राधिका-याच्या प्रमाणपत्राशिवाय अन्य कोणताही दस्तावेज वयाचा पुरावा म्हणून ग्राह्य धरु नये. ज्या बालकांच्या जन्म तारखेचा कोणताही पुरावा उपलब्ध नसेल अशा बालकांच्या वयाची चाचणी शासकीय जिल्हा रुग्णालयातून करुन घेवून त्याचे वय निश्चित करुन घ्यावे.

८) प्रस्तावाची छाननी पूर्ण झाल्यावर अर्जदारास अनाथ प्रमाणपत्र निर्गमित करण्याची शिफारस करुन किंवा अनाथ प्रमाणपत्रासाठीचा अर्ज नाकारण्यात आल्यास त्याबाबतची कारणे नमूद करुन प्रस्ताव जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांच्याकडे परत पाठवावा.

९) जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांनी बाल कल्याण समितीकडून प्राप्त प्रस्ताव शिफारशीसह संबंधित विभागीय उपायुक्त (महिला व बाल विकास) यांच्याकडे कार्यवाहीसाठी पाठवावा.

१०) जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांनी सादर केलेला प्रस्ताव /शिफारस विचारात घेऊन विभागीय उपायुक्त, महिला व बाल विकास यांनी अनाथ प्रमाणपत्र निर्गमित करण्याची कार्यवाही पूर्ण करावी. अनाथ प्रमाणपत्र निर्गमित करण्याची शिफारस करण्यात आलेल्या प्रस्तावामध्ये प्रत्यक्षात अर्ज नाकारण्यासाठी पुरेशी कारणे आढळल्यास ती नमूद करुन प्रस्ताव जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांचेमार्फत बाल कल्याण समितीकडे फेरनिर्णयासाठी पाठवावा.

११) तथापि महिला व बाल विकास विभागाव्यतिरिक्त अन्य विभागांकडून मान्यता प्रदान करण्यात आलेल्या अनाथालये अथवा तत्सदृश संस्थांमध्ये वास्तव्यास असलेल्या किंवा अशा संस्थांमधून बाहेर पडलेल्या अनाथांना अनाथ प्रमाणपत्र देण्यासाठीची कार्यवाही ही संस्थाबाह्य प्रवर्गातील अनाथांना अनाथ प्रमाणपत्र देण्यासाठी विहीत पद्धतीनुसार करणे आवश्यक राहील.

## ६. "संस्थाबाह्य" प्रवर्गातील अनाथांसाठी प्रमाणपत्र निर्गमित करावयाची कार्यपध्दती

१) नातेवाईकांकडे पालन पोषण होणा-या/झालेल्या किंवा शासनाच्या अन्य विभागांकडून मान्यता मिळालेल्या संस्थेमध्ये वास्तव्यास असलेल्या किंवा संस्थेमधून बाहेर पडलेल्या अनाथांना अनाथ प्रमाणपत्रासाठीचा अर्ज संबंधित संस्थाचालकांच्या किंवा आपल्या नातेवाईकाच्या माध्यमातून किंवा स्वतः जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांचेकडे करता येईल.

२) जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांनी अर्जदारास अनाथ प्रमाणपत्र मिळणेसाठीच्या प्रस्तावाची छाननी पुढील दस्तावेज/पुराव्यांचा विचार करुन करावी - संबंधित संस्थेचे संचालक यांनी सादर केलेली कागदपत्रे, जन्म-मृत्यू नोंद रजिस्टर, ग्रामसेवक/मुख्याधिकारी/वार्ड अधिकारी किंवा इतर सक्षम अधिकारी यांचेकडून निर्गमित मृत्यू दाखला, आवश्यकतेनुसार शासकीय जिल्हा रुग्णालयाकडून प्राप्त वयाचा पुरावा, शाळा सोडल्याचा दाखला, गृह चौकशी अहवाल, बाल कल्याण समिती/बाल न्याय मंडळाचे संबंधिताबाबतचे आधीचे आदेश इत्यादी.

३) या छाननीनंतर जिल्हा महिला बाल विकास अधिकारी यांनी संबंधित अर्जदारास अनाथ घोषित करण्यासाठीचा प्रस्ताव स्वयंस्पष्ट अभिप्रायासह संबंधित जिल्ह्याच्या बाल कल्याण समितीस सादर करावा.

४) बाल कल्याण समितीने जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांचेकडून प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर अर्जाची पुन्हा छाननी करावी. आवश्यकता असेल तर अर्जाच्या छाननीसाठी अर्जदाराची मुलाखत किंवा पोलीस / महसूल विभागाच्या यंत्रणेचे सहाय्य घ्यावे.

५) बालगृहात/अनाथालयात दाखल करण्यात येणाऱ्या काही अनाथ बालकांची जन्म तारीख/वय अंदाजे नमूद करण्यात येते. सक्षम प्राधिका-याच्या प्रमाणपत्राशिवाय अन्य कोणताही दस्तावेज वयाचा पुरावा म्हणून ग्राह्य धरु नये. ज्या बालकांच्या जन्म तारखेचा कोणताही पुरावा उपलब्ध नसेल अशा बालकांच्या वयाची चाचणी शासकीय जिल्हा रुग्णालयातून करुन घेवून त्याचे वय निश्चित करुन घ्यावे.

६) प्रस्तावाची छाननी पूर्ण झाल्यावर अर्जदारास अनाथ प्रमाणपत्र निर्गमित करण्याची शिफारस करुन किंवा अनाथ प्रमाणपत्रासाठीचा अर्ज नाकारण्यात आल्यास त्याबाबतची कारणे नमूद करुन प्रस्ताव जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांच्याकडे परत पाठवावा.

७) जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांनी बाल कल्याण समितीकडून प्राप्त प्रस्ताव शिफारशीसह संबंधित विभागीय उपायुक्त (महिला व बाल विकास) यांच्याकडे कार्यवाहीसाठी पाठवावा.

८) जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांनी सादर केलेला प्रस्ताव /शिफारस विचारात घेऊन विभागीय उपायुक्त, महिला व बाल विकास यांनी अनाथ प्रमाणपत्र निर्गमित करण्याची कार्यवाही पूर्ण करावी. अनाथ प्रमाणपत्र निर्गमित करण्याची शिफारस करण्यात आलेल्या प्रस्तावामध्ये प्रत्यक्षात अर्ज नाकारण्यासाठी पुरेशी कारणे आढळल्यास ती नमूद करुन प्रस्ताव जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांचेमार्फत बाल कल्याण समितीकडे फेरनिर्णयासाठी पाठवावा.

**७. अनाथ प्रमाणपत्राचा नमुना**

१) जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी व बाल कल्याण समितीची शिफारस विचारात घेवून विभागीय उपायुक्त, महिला व बाल विकास यांनी चांगल्या प्रतीच्या कागदावर सोबतच्या प्रपत्रामध्ये विहित करण्यात आलेल्या नमुन्यानुसार छापील लेटर हेडवर अनाथ प्रमाणपत्र स्वाक्षरी करुन वितरीत करावे.

२) अनाथ प्रमाणपत्रांसाठी पुढीलप्रमाणे संकेतांक विहीत करण्यात येत आहे. यामध्ये पहिली दोन अक्षरे महाराष्ट्र राज्य/पुढील तीन अक्षरे प्रमाणपत्र वितरीत करण्याची कार्यवाही करणा-या जिल्ह्याची आद्याक्षरे/ पुढील तीन अक्षरे बालगृहाचा प्रकार [(IWC) हे महिला व बालविकास विभागाच्या अखत्यारीतील संस्थांमधील अनाथांसाठी; (IOG) हे महिला व बालविकास विभागाव्यतिरीक्त शासनाच्या अन्य विभागांकडून मान्यताप्राप्त संस्थांतील अनाथांसाठी आणि (NIN) कोणत्याही संस्थेत दाखल नसलेल्या व नातेवाईकांकडे पालन पोषण झालेल्या अनाथांसाठी] / संकेतामधील शेवटचे चार अंक हे संबंधित विभागीय उपायुक्त, महिला व बालविकास कार्यालयातील अनाथ प्रमाणपत्रांच्या नोंदवही (register) मधील अनाथ प्रमाणपत्राचा अनुक्रमांक दर्शवतील.

उदा. परभणी जिल्ह्यातील महिला व बालविकास अधिकारी कार्यालयाकडून प्रक्रिया झालेल्या बालगृहातील अनाथास द्यावयाच्या प्रमाणपत्राचा सांकेतांक हा MH/PRN/IWC/०००१ असा असेल.

३) विभागीय उप आयुक्त, महिला व बाल विकास विभाग यांनी त्यांच्या विभागातील अनाथ प्रमाणपत्रांची नोंदवही पुढीलप्रमाणे अद्ययावत करावी - यापूर्वी अनाथ प्रमाणपत्रे निर्गमित केल्याच्या दिनांकानुसार क्रमवारीने सर्व

प्रवर्गातील अनाथांची नोंद एकाच नोंदवहीमध्ये करुन घ्यावी. व त्यापुढे या शासन निर्णयानुसार अनाथ प्रमाणपत्रे निर्गमित करताना नोंद घेऊन त्यानुसार क्रमांक देण्यात यावेत.

४) विभागीय उपायुक्त यांनी वितरीत केलेल्या प्रमाणपत्राची एक प्रत आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे यांना अग्रेषित करावी.

५) अनाथ प्रमाणपत्राच्या अनुषंगाने जर कांही तक्रार असल्यास यासंदर्भात अपिलीय प्राधिकारी हे आयुक्त, महिला व बाल विकास हे राहतील.

या शासन निर्णयातील तरतुदी या दिनांक ३१/१०/२०२२ नंतर होणा-या नवीन परीक्षांना लागू होतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०२३०४०६१३४५५५५०३० असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Khadija Farooque Naikwade

Digitally signed by Khadija Farooque Naikwade
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=WOMEN AND CHILD DEVELOPMENT DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8cd35f5dfe17a9e9a0cd531b6bb11d782183e791bc817e7a736def213ac7d71b, pseudonym=97FCB88BB2290D50D7776C4E6535999B94A26921, serialNumber=6F53F8BF0DEB07218B68698BE9E71A15840F8812D6E796D15093EAEC9A19F0DF, cn=Khadija Farooque Naikwade
Date: 2023.04.06 14:05:29 +05'30'

(ख. फा. नाईकवाडे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई,
२) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय,
३) मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई,
४) मा.अध्यक्ष/उपाध्यक्ष, विधानसभा, विधानमंडळ, मुंबई,
५) मा.सभापती/उपसभापती, विधानपरिषद, विधानमंडळ, मुंबई,
६) मा.मंत्री, महिला व बाल विकास यांची खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
७) मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा/ विधानपरिषद, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
८) सर्व विधानसभा सदस्य/विधानपरिषद सदस्य, विधानमंडळ, मुंबई,
९) मा. मुख्य सचिव,महाराष्ट्र राज्य यांचे उपसचिव,मंत्रालय,मुंबई,
१०) सर्व विभागांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई,
११) प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधानसभा),
१२) प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधानपरिषद),
१३) सर्व विभागीय आयुक्त,
१४) आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे,
१५) आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई,
१६) सर्व सहायक आयुक्त मागास वर्ग कक्ष, कोकण विभाग, पुणे विभाग, नाशिक विभाग, नागपूर विभाग, अमरावती विभाग, औरंगाबाद विभाग,
१७) सर्व जिल्हाधिकारी,
१८) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
१९) प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई,

२०) प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
२१) प्रबंधक, लोकायुक्त आणि उपलोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
२२) प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई, नागपूर, औरंगाबाद,
२३) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
२४) सचिव, राज्य माहिती आयोग, मुंबई,
२५) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई,
२६) राज्यातील सर्व महामंडळे आणि उपक्रम यांचे व्यवस्थापकीय संचालक,
२७) सर्व महानगर पालिकांचे आयुक्त,
२८) सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषदा/नगरपालिका,
२९) महालेखापाल, महाराष्ट्र (लेखा व अनुज्ञेयता) मुंबई /नागपूर,
३०) महालेखापाल, महाराष्ट्र (लेखा परीक्षा), मुंबई/नागपूर,
३१) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
३२) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
३३) सर्व मंत्रालयीन विभागांच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
३४) ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई,
३५) सर्व मान्यताप्राप्त राजकीय पक्षांची मध्यवर्ती कार्यालये, महाराष्ट्र राज्य,
३६) निवडनस्ती, महिला व बाल विकास विभाग ( कार्यासन -०३).

**प्रपत्र**

**अनाथ प्रमाणपत्र**

**संदर्भ-** १.शासन निर्णय, महिला व बाल विकास विभाग, क्र....................दिनांक............................
२.बाल कल्याण समिती................यांचे पत्र क्र............दिनांक ........अन्वये केलेली शिफारस.
३.जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी...........यांचे शिफारस पत्र क्र..............दिनांक......

..........................................................................................................................................

**संकेतांक क्रमांक ....................**

नवीन फोटो

**विभागीय उपायुक्त कार्यालयाचा गोल शिक्का**

**नाव** - ...........................................................................

**१) संस्थात्मक प्रवर्गातील अनाथांसाठी "अनाथ" असल्याचे प्रमाणपत्र.**

प्रमाणित करण्यात येते की, प्रवेशित नामे ----------------------------- हा/ही मुलगा / मुलगी वय वर्षे ---- जन्मदिनांक ----------- दिनांक --------------- पासून --------------- संस्था (नोंदणी क्रमांक), पत्ता-------- ------------- या --------------- विभागाच्या शासकीय / शासनमान्य स्वयंसेवी बालगृहात /अनाथलयात त्या संस्थेतील प्रवेशित रजिस्टरमधील नोंदणी क्रमांक --------------- नुसार दाखल झालेला अनाथ आहे. संस्थेत दाखल होण्याची पार्श्वभूमी :- (वर्णन द्यावे)

-----------------------------------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------------------------

प्रवेशित नामे ................................ आई वडील मयत आहेत. / याच्या/हिच्या आई वडिलांचा ठाव ठिकाणा सर्व मार्गांचा अवलंब करूनही अद्याप लागलेला नाही. किंवा लागण्याची शक्यता नाही. त्यामुळे संबंधित प्रवेशित हा अनाथ असल्याचे प्रमाणित करण्यात येत आहे.

**२) संस्थाबाह्य प्रवर्गातील मुलासाठी अनाथ असल्याचे प्रमाणपत्र.**

प्रमाणित करण्यात येते की, अर्जदार नामे ----------------------------- वय वर्षे --------------- जन्म दिनांक ------------- हा /ही महिला व बाल विकास विभाग अथवा अन्य विभागांकडून मान्यताप्राप्त संस्थेमध्ये

कधीही दाखल नव्हता/नव्हती. ................ याचे/हिचे आई वडील मयत असून त्याच्या/तिच्या ------------ या नातेवाईकांची माहिती उपलब्ध आहे. संबंधित अर्जदार अनाथ असल्याचे प्रमाणित करण्यात येत आहे.

त्याचे/ तिचे भविष्य उज्ज्वल व्हावे, ही शुभेच्छा.

(गोल शिक्का)

स्वाक्षरी /-

नाव-

विभागीय उपायुक्त,महिला व बाल विकास,

...........................विभाग.

अनाथ आरक्षण धोरणामध्ये भरतीविषयक तरतूद विहीत करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**महिला व बाल विकास विभाग**
**शासन पूरकपत्र क्रमांक- अनाथ-२०२२/प्र.क्र.१२२/का-०३**
नविन प्रशासन भवन, तिसरा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक- १० मे, २०२३.

वाचा :-

१) शासन निर्णय, महिला व बाल विकास विभाग, क्र.संकीर्ण-२०१३/प्र.क्र.१०९/का.०३, दि.०६.०६.२०१६.
२) शासन शुध्दीपत्रक, महिला व बाल विकास विभाग क्र.संकीर्ण-२०१३/प्र.क्र.१०९/का-३, दिनांक ९.५.२०१८.
३) शासन निर्णय, महिला व बाल विकास विभाग क्र.अमुजा-२०११/प्र.क्र.२१२/का.०३, दि.०२.०४.२०१८.
४) शासन परिपत्रक, महिला व बाल विकास विभाग क्र. अनाथ-२०१८/प्र.क्र.१८२/का.०३, दि.२०.८.२०१९.
५) शासन निर्णय, महिला व बाल विकास विभाग क्र. अनाथ-२०१८/प्र.क्र.१८२/का-०३,दि.२३ .०८.२०२१
६) शासन शुध्दीपत्रक महिला व बाल विकास विभाग क्र. अनाथ-२०१८/प्र.क्र.१८२/का-०३, दिनांक २६.११.२०२१.
७) दिनांक २३.०३.२०२३ रोजी आयोजित मा. मंत्रीमंडळाच्या बैठकीचे इतिवृत्त.
८) शासन निर्णय, महिला व बाल विकास विभाग, क्र - अनाथ-२०२२/प्र.क्र.१२२/का-०३, दि. ६.४.२०२३

**शासन पूरकपत्र :-**

अनाथांना दिव्यांगांच्या धर्तीवर शिक्षण व शासकीय (निमशासकीय तसेच शासन अनुदानित संस्थांमधील) पद भरतीमध्ये उपलब्ध पदांच्या १ टक्का इतके आरक्षण लागू तसेच अनाथांचे संस्थात्मक व संस्थाबाह्य असे दोन प्रवर्ग करुन अनाथ आरक्षणातून उपलब्ध होणा-या पदांची या दोन प्रवर्गांमध्ये विभागणी करणे, अनाथ आरक्षणासाठी पात्रतेचे निकष, आरक्षणाचे स्वरुप, अटी व शर्ती, आरक्षणाच्या अंमलबजावणीसाठी मार्गदर्शक सूचना, अनाथांसाठी प्रमाणपत्र निर्गमित करावयाची कार्यपध्दती तसेच अनाथ प्रमाणपत्राचा नमुना इत्यादी बाबी विहीत करण्यासाठी वाचा क्र. ८ येथील शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

या शासन निर्णयातील मुद्दा **क्रमांक २ - आरक्षणाचे स्वरुप** मधील उपमुद्दा क्रमांक ४) नंतर पुढीलप्रमाणे **उपमुद्दा क्रमांक ५) समाविष्ट** करण्यात येत आहे:

"५) एखाद्या भरती प्रक्रियेमध्ये अनाथ आरक्षणाच्या माध्यमातून अनाथांच्या एका प्रवर्गासाठी उपलब्ध जागांवर गुणवत्तेनुसार त्या प्रवर्गातील अनाथ उमेदवार पर्याप्त प्रमाणात उपलब्ध होऊ शकले नाहीत तर त्या भरती प्रक्रियेमध्ये ती पदे अनाथांच्या दुस-या प्रवर्गातील उमेदवारांमधून गुणवत्तेनुसार भरण्यात यावीत."

उपरोक्त तरतूद ही दि. ३१/१०/२०२२ नंतर होणा-या नवीन परीक्षांना लागू होईल.

सदर शासन पूरकपत्र महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा सांकेतांक २०२३०५१०१७११५२५९३० असा आहे. हे शासन पूरकपत्र डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Khadija
Farooque
Naikwade

Digitally signed by Khadija Farooque Naikwade
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=WOMEN AND CHILD DEVELOPMENT DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8cd35f5dfe17a9e9a0cd531b6bb11d782183e791bc817e7a736def213ac7d71b, pseudonym=97FCB88BB2290D50D7776C4E6535999B94A26921, serialNumber=6F53F8BF0DEB07218B68698BE9E71A15840F8812D6E796D15093EAEC9A19F0DF, cn=Khadija Farooque Naikwade
Date: 2023.05.10 17:29:58 +05'30'

(ख. फा. नाईकवाडे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई,
२) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय,
३) मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई,
४) मा.अध्यक्ष/उपाध्यक्ष, विधानसभा, विधानमंडळ, मुंबई,
५) मा.सभापती/उपसभापती, विधानपरिषद, विधानमंडळ, मुंबई,
६) मा.मंत्री, महिला व बाल विकास यांची खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
७) मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा/ विधानपरिषद, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
८) सर्व विधानसभा सदस्य/विधानपरिषद सदस्य, विधानमंडळ, मुंबई,
९) मा. मुख्य सचिव,महाराष्ट्र राज्य यांचे उपसचिव,मंत्रालय,मुंबई,
१०) सर्व विभागांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई,
११) प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधानसभा),
१२) प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधानपरिषद),
१३) सर्व विभागीय आयुक्त,
१४) आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे,
१५) आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई,
१६) सर्व सहायक आयुक्त मागास वर्ग कक्ष, कोकण विभाग, पुणे विभाग, नाशिक विभाग, नागपूर विभाग, अमरावती विभाग, औरंगाबाद विभाग,
१७) सर्व जिल्हाधिकारी,
१८) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
१९) प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई,
२०) प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
२१) प्रबंधक, लोकायुक्त आणि उपलोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
२२) प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई, नागपूर, औरंगाबाद,
२३) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
२४) सचिव, राज्य माहिती आयोग, मुंबई,
२५) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई,
२६) राज्यातील सर्व महामंडळे आणि उपक्रम यांचे व्यवस्थापकीय संचालक,
२७) सर्व महानगर पालिकांचे आयुक्त,
२८) सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषदा/नगरपालिका,
२९) महालेखापाल, महाराष्ट्र (लेखा व अनुज्ञेयता) मुंबई /नागपूर,

३०) महालेखापाल, महाराष्ट्र (लेखा परीक्षा), मुंबई/नागपूर,
३१) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
३२) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
३३) सर्व मंत्रालयीन विभागांच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
३४) ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई,
३५) सर्व मान्यताप्राप्त राजकीय पक्षांची मध्यवर्ती कार्यालये, महाराष्ट्र राज्य,
३६) निवडनस्ती, महिला व बाल विकास विभाग ( कार्यासन -०३).

**महाराष्ट्र शासन**
**महिला व बाल विकास विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक- अनाथ-२०१८/प्र.क्र.१८२/का-०३**
नवीन प्रशासन भवन, तिसरा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक- ६ सप्टेंबर, २०२२

**वाचा :-**
१.महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१३/प्र.क्र.१०९/का.०३, दि.०६.०६.२०१६.
२.महिला व बाल विकास विभाग शासन शुध्दीपत्रक क्र.संकीर्ण-२०१३/प्र.क्र.१०९/का-३, दि.९.५.२०१८.
३.महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय क्र.अमुजा-२०११/प्र.क्र.२१२/का.०३, दि.०२.०४.२०१८.
४.महिला व बाल विकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक-अनाथ-२०१८/प्र.क्र.१८२/का.३, दि.२०.८.२०१९.
५.शासन निर्णय, महिला व बाल विकास विभाग, क्र. अनाथ -२०१८/प्र.क्र.१८२/का-०३ दि.२३.८.२०२१
६.शासन निर्णय, महिला व बाल विकास विभाग, क्र. अनाथ-२०१८/प्र.क्र.१८२/का-०३ दि.२६.११.२०२१

**प्रस्तावना :-**

अनाथ बालकांना शासनाच्या विविध सेवा, सुविधा व कल्याणकारी योजनांचा लाभ मिळावा यासाठी त्यांना अनाथ असल्याचे प्रमाणपत्र देण्याचा निर्णय वाचा क्र. १ येथील शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे. अनाथ प्रमाणपत्र वितरीत करण्यापूर्वी महिला व बाल विकास विभागाच्या क्षेत्रिय यंत्रणेकडून संबंधित अर्जदाराची कौटुंबिक पार्श्वभूमी व सद्यःस्थिती तसेच आवश्यक ती सर्व कागदपत्रे यांची तपासणी करुन त्याबाबत शिफारस करण्यात येते. सुरुवातीपासूनच अनाथ प्रमाणपत्र वितरीत करण्याचे अधिकार हे महिला व बाल विकास विभागातील अधिका-यांकडेच सोपविण्यात आलेले आहेत. अनाथ प्रमाणपत्र देताना येणा-या अडचणींचे निराकरण करणे तसेच अनाथांना दिव्यांगांच्या धर्तीवर १ टक्का आरक्षण लागू करणे, अनाथ प्रमाणपत्र नमून्यात बदल करणे व यानुषंगाने आरक्षणासंबंधीत सर्वसमावेशक तरतूदी विहीत करण्यासाठी उपरोक्त वाचा क्र.१ ते ४ मधील शासन निर्णय अधिक्रमित करून वाचा क्र. ५ येथील शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. या शासन निर्णयामध्ये अनाथ प्रमाणपत्र वितरीत करावयाची प्रक्रिया विहीत करण्यात आली असून सद्यःस्थितीत अनाथ प्रमाणपत्र वितरीत करण्याचे अधिकार केवळ विभागीय उपायुक्त, महिला व बाल विकास यांनाच देण्यात आलेले आहेत. याबाबत काही तक्रार उद्भवल्यास त्यासाठी आयुक्त, महिला व बाल विकास यांना अपिलीय प्राधिकारी घोषित करण्यात

आले आहे. तथापि, महिला व बाल विकास विभागाच्या अधिका-यांव्यतिरीक्त अन्य विभागाच्या अधिकाऱ्यांकडूनदेखील अनाथ प्रमाणपत्र वितरित केले जात असल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आली आहे. अशा प्रकारे बेकायदेशीरपणे अनाथ प्रमाणपत्र वितरीत केल्यास संबंधित अर्जदाराची दिशाभूल होऊन त्यांचे शैक्षणिक तथा इतर नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे महिला व बाल विकास विभागाच्या सक्षम प्राधिका-या व्यतिरीक्त अन्य यंत्रणेद्वारे वितरीत करण्यात आलेली अनाथ प्रमाणपत्रे अवैध असल्याचे तसेच ती ग्राह्य नसल्याचे संबंधितांच्या निदर्शनास आणून देण्यासाठी परीपत्रक निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन परिपत्रक</u> :-**

शासन निर्णय, महिला व बाल विकास विभाग, क्र. अनाथ-२०१८/प्र.क्र.१८२/का-०३ दिनांक- २३.८.२०२१ व शासन शुद्धीपत्रक दि. २६.११.२०२१ अन्वये अनाथ प्रमाणपत्र वितरीत करण्याचे अधिकार केवळ विभागीय उपायुक्त, महिला व बाल विकास यांनाच असून त्याबाबत काही तक्रार उद्भवल्यास त्यासाठी आयुक्त, महिला व बाल विकास हे अपिलीय प्राधिकारी आहेत याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

उपरोक्त बाब सर्व प्रशासकीय विभाग तसेच जिल्हाधिकारी यांनी आपल्या अधीनस्थ क्षेत्रीय अधिका-यांच्या निदर्शनास आणून द्यावी. तसेच, अनाथ प्रमाणपत्रासाठी अर्ज प्राप्त झाल्यास स्वतःच्या अधिकारात निर्णय अथवा कार्यवाही न करता ते संबंधित जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांचेकडे अग्रेषित करुन त्याबाबत अर्जदारास कळविण्याबाबतही सूचित करावे. तसेच अधिका-यांकडून बेकायदेशीरपणे अनाथ प्रमाणपत्रे वितरीत करण्यात आल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित अधिका-यांवर योग्य ती कार्यवाही करण्याबाबत संबंधित विभागांनी विचार करावा.

विभागीय उपायुक्त, महिला व बाल विकास यांनी वितरीत केलेली अनाथ प्रमाणपत्रेच अधिकृत असल्याने अन्य विभागातील अधिका-यांनी वितरीत केलेली अनाथ प्रमाणपत्रे ही अवैध असल्याचे सर्व प्रशासकीय विभाग, जिल्हाधिकारी तसेच जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्यांच्या अधिकारक्षेत्रातील सर्व भरती प्राधिकरणे/ निवड मंडळे यांच्या निदर्शनास आणून द्यावे. तसेच, विभागीय उपायुक्त, महिला व बाल विकास यांचेव्यतिरिक्त अन्य विभागातील अधिका-यांनी वितरीत केलेली अनाथ प्रमाणपत्रे भरती प्रक्रियेमध्ये स्वीकारू वा मान्य करु नयेत अशाही सूचना संबंधितांना देण्यात याव्यात.

अनाथ आरक्षणाचा लाभ घेऊन माध्यमिक, उच्च माध्यमिक व उच्च शिक्षण संस्थांमध्ये प्रवेश घेताना विद्यार्थ्यांकडून सादर करण्यात येणारी अनाथ प्रमाणपत्रे ही विभागीय उपायुक्त, महिला व बाल विकास यांचेकडूनच वितरीत झाल्याची खात्री करुन घेण्याबाबत शालेय शिक्षण विभाग, उच्च व तंत्र शिक्षण विभाग व वैद्यकीय शिक्षण विभाग यांनी त्यांचे स्तरावरून सर्व संबंधितांना कळवावे. त्याच प्रमाणे अन्य कोणत्या यंत्रणेकडून प्राप्त झालेले अनाथ प्रमाणपत्र सादर करणा-या संबंधित

विद्यार्थ्यास शक्यतोवर संबंधित जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांचेशी संपर्क साधून अधिकृत प्रमाणपत्र प्राप्त करुन घेण्यासाठी मार्गदर्शन करण्याबाबतही संबंधितांना कळवावे.

सर्व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांनी आपल्या जिल्ह्यामध्ये अन्य कोणत्या यंत्रणेकडून अनाथ प्रमाणपत्र वितरीत केले नसल्याबाबतची खातरजमा करुन घ्यावी. असे कोणते प्रमाणपत्र वितरीत झालेले आढळून आल्यास संबंधित अर्जदारास प्रचलित नियमानुसार योग्य प्रमाणपत्र मिळवून देण्यासाठी आवश्यक ते मार्गदर्शन व मदत उपलब्ध करुन द्यावी.

अनाथ प्रमाणपत्र वितरीत करताना वाचा क्र. ५ व ६ येथील शासन निर्णय व शुद्धीपत्रक यांमधील तरतुदींचे काटेकोर पालन होईल याची सर्व विभागीय उपायुक्त, महिला व बाल विकास यांनी दक्षता घ्यावी.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक २०२२०९०६१५३९५७७२३० असा आहे. हे शासन परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Khadija
Farooque
Naikwade

Digitally signed by Khadija Farooque Naikwade
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=WOMEN AND CHILD DEVELOPMENT DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8cd35f5dfe17a9e9a0cd531b6bb11d782183e791bc817e7a736def213ac7d71b, pseudonym=97FCB88BB2290D50D7776C4E6535999B94A26921, serialNumber=6F53F8BF0DEB07218B68698BE9E71A15840F8812D6E796D15093EAEC9A19F0DF, cn=Khadija Farooque Naikwade
Date: 2022.09.06 18:14:04 +05'30'

**( ख. फा. नाईकवाडे )**

**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रति**

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई,
२) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय,
३) मा. उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
४) मा.अध्यक्ष/उपाध्यक्ष/ सदस्य, विधानसभा/ विधानपरिषद, विधानमंडळ, मुंबई,
५) मा.मंत्री/ राज्यमंत्री, महिला व बाल विकास यांची खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
६) मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा/ विधानपरिषद, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
७) सर्व विधानसभा सदस्य/विधानपरिषद, विधानमंडळ, मुंबई,
८) मा.मुख्य सचिव,महाराष्ट्र राज्य यांचे उपसचिव,मंत्रालय,मुंबई,
९) सर्व विभागांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई,
१०) प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय ( विधानसभा),
११) प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय ( विधानपरिषद),
१२) सर्व विभागीय आयुक्त,
१३) आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे,
१४) आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई,
१५) सर्व सहायक आयुक्त मागास वर्ग कक्ष, कोकण विभाग, पुणे विभाग, नाशिक विभाग, नागपूर विभाग, अमरावती विभाग, औरंगाबाद विभाग,

१६) सर्व जिल्हाधिकारी,
१७) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
१८) प्रबंधक, उच्च न्यायालय, मुळ शाखा, मुंबई,
१९) प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
२०) प्रबंधक, लोकायुक्त आणि उपलोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
२१) प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई, नागपूर, औरंगाबाद,
२२) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
२३) सचिव, राज्य माहिती आयोग,
२४) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई,
२५) राज्यातील सर्व महामंडळे आणि उपक्रम यांचे व्यवस्थापकीय संचालक,
२६) सर्व महानगर पालिकांचे आयुक्त,
२७) सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषदा/नगरपालिका,
२८) महालेखापाल, महाराष्ट्र ½ (लेखा व अनुज्ञेय) मुंबई /नागपूर,
२९) महालेखापाल, महाराष्ट्र ½ (लेखा परिक्षा), मुंबई/नागपूर,
३०) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
३१) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
३२) सर्व मंत्रालयीन विभागांच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
३३) सर्व मंत्रालयीन विभाग, त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांच्या अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख यांना सदर पत्राची प्रत, त्यांच्या स्तरावरुन स्वतंत्रपणे पाठवून कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात याव्यात.
३४) ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई,
३५) सर्व मान्यताप्राप्त राजकीय पक्षांची मध्यवर्ती कार्यालये, महाराष्ट्र राज्य,
३६) निवडनस्ती, महिला व बाल विकास विभाग ( कार्यासन -०३).

**अनाथांच्या १% आरक्षणाच्या धोरणात बदल करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**महिला व बाल विकास विभाग**
**शासन शुद्धीपत्रक क्रमांक- अनाथ-२०१८/प्र.क्र.१८२/का-०३**
नविन प्रशासन भवन, तिसरा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक- २६ नोव्हेंबर, २०२१.

वाचा :-

१) महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१३/प्र.क्र.१०९/का.०३, दि.०६.०६.२०१६.
२) महिला व बाल विकास विभाग शासन शुध्दीपत्रक क्र.संकीर्ण-२०१३/प्र.क्र.१०९/का-३, दि. ९.५.२०१८.
३) महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय क्र.अमुजा-२०११/प्र.क्र.२१२/का.०३, दि. ०२.०४.२०१८.
४) महिला व बाल विकास विभाग शासन परिपत्रक क्रमांक-अनाथ-२०१८/प्र.क्र.१८२/का.०३, दि. २०.८.२०१९.
५) मा.राज्यमंत्री (महिला व बाल विकास) यांचे अध्यक्षतेखाली दिनांक २१.१०.२०२० रोजी आयोजित बैठकीचे इतिवृत्त.
६) शासन निर्णय, महिला व बाल विकास विभाग, क्र. अनाथ-२०१८/प्र.क्र.१८२/का-०३ दिनांक- २३.८.२०२१

**शासन शुद्धीपत्रक**

अनाथांना दिव्यांगांच्या धर्तीवर १ टक्के आरक्षण लागू करणे, अनाथांच्या व्याख्येमध्ये बदल करणे,अनाथांची तीन प्रकारामध्ये वर्गवारी करणे, अनाथ प्रमाणपत्र नमून्यात बदल करणे व यानुषंगाने आरक्षणासंबंधीत उपरोक्त वाचा क्र.१ ते ४ मधील शासन निर्णय अधिक्रमीत करून एकच सर्वसमावेशक शासन निर्णय निर्गमीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार वाचा क्र. ६ येथील शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. या शासन निर्णयातील

**परीच्छेद क्र. १ मध्ये**

“बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २०१५ अन्वये काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या अनाथ, निराधार बालकांना संस्थेतून बाहेर पडल्यानंतर जातीचा दाखला नसल्यामुळे विविध शासकीय लाभांपासून वंचित रहावे लागते. त्यामुळे अनाथ मुलांना राज्य शासनाच्या विविध सवलतींचा लाभ घेता यावा याकरीता खालीलप्रमाणे वर्गीकृत अनाथांना शिक्षण व नोकरी यामध्ये दिव्यांगांच्या धर्तीवर १ टक्का आरक्षण लागू करण्यास मान्यता देण्यात येत आहे.”

ऐवजी

“बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २०१५ अन्वये अनाथ, निराधार बालकांना काळजी व संरक्षणाची गरज असल्याने या मुलांना राज्य शासनाच्या विविध सवलतींचा लाभ घेता यावा याकरीता उपरोक्त वाचा मधील क्र. १ ते ४ येथील शासन निर्णय, शुद्धीपत्रक व परीपत्रक अधिक्रमित करून अनाथांना शिक्षण व नोकरी यामध्ये दिव्यांगांच्या धर्तीवर १ टक्का आरक्षण लागू करण्यास मान्यता देण्यात येत आहे. या आरक्षणासाठी अनाथांचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यात येत आहे.”

असे वाचावे.

**परीच्छेद २ अटी व शर्तीमधील अट क्र. ३ मध्ये**

“पदभरती तसेच शैक्षणिक, वसतिगृहे व व्यावसायिक शिक्षण प्रवेशासाठी अनाथ आरक्षण लागू राहील.”

ऐवजी

“शासकीय पदभरती तसेच शैक्षणिक संस्था, वसतिगृहे व व्यावसायिक शिक्षण संस्थांमध्ये प्रवेशासाठी अनाथ आरक्षण लागू राहील.”

असे वाचावे.

**परीच्छेद २ अटी व शर्तींमधील अट क्र. ४ मध्ये**

“अनाथ पदाची गणना पदभरतीच्या तसेच शैक्षणिक प्रवेशासाठी उपलब्ध पदसंख्येच्या १% राहील.”

ऐवजी

“अनाथांसाठी आरक्षित पदे ही पदभरतीसाठी उपलब्ध एकूण पदसंख्येच्या तसेच शैक्षणिक प्रवेशासाठी उपलब्ध एकूण जागांच्या १% इतकी असतील.”

असे वाचावे.

**परीच्छेद ४ अनाथ प्रमाणपत्रासाठी आवश्यक कागदपत्रे/ निकष यांमधील निकष क्रमांक २ मध्ये**

“"क" प्रवर्गात येणा-या अनाथांचे आई-वडील हयात नसलेबाबत ग्रामसेवक/मुख्याधिकारी/वार्ड अधिकारी किंवा इतर सक्षम अधिकारी यांचेकडून मिळालेला मृत्यु दाखला किंवा तत्सम कागदपत्रे जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांनी विचारात घेवून तो अनाथ असल्याचे प्रमाणित करावे.”

ऐवजी

“"क" प्रवर्गात येणा-या अनाथांच्या आई-वडील यांचा ग्रामसेवक/मुख्याधिकारी/वार्ड अधिकारी किंवा सक्षम अधिकारी यांचेकडून मिळालेला मृत्यू दाखला किंवा तत्सम कागदपत्रे तपासून संबंधित अनाथाने वयाची १८ वर्षे पूर्ण करण्यापूर्वी त्याचे/तिचे आई व वडील वारले असल्याचे जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांनी प्रमाणित करावे.”

असे वाचावे.

**परीच्छेद ६ "क" प्रवर्गातील (संस्थेत कधीही दाखल नसलेले) अनाथ मुलांसाठी प्रमाणपत्र प्राप्त करणेसाठी करावयाच्या अर्जाची कार्यपध्दती मधील मुद्दा क्र. २ मध्ये**

“"क" प्रवर्गात येणा-या अनाथांचे आई-वडील हयात नसलेबाबत ग्रामसेवक/मुख्याधिकारी/वार्ड अधिकारी किंवा सक्षम अधिकारी यांचेकडून मिळालेला दाखला जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांनी तपासून प्रमाणित करावा.”

ऐवजी

“"क" प्रवर्गात येणा-या अनाथांच्या आई-वडील यांचा ग्रामसेवक/मुख्याधिकारी/वार्ड अधिकारी किंवा सक्षम अधिकारी यांचेकडून मिळालेला मृत्यू दाखला किंवा तत्सम कागदपत्रे तपासून संबंधित अनाथाने वयाची १८ वर्षे पूर्ण करण्यापूर्वी त्याचे/तिचे आई व वडील वारले असल्याचे जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांचेकडून प्रमाणित करण्यात येईल.”

असे वाचावे.

**मुद्दा क्र. ३ च्या सुरूवातीस**

**“अशा प्रकारे प्रमाणित केलेल्या कागदपत्रांसह” हे शब्द समाविष्ट करण्यात येत आहेत.**

**परीच्छेद क्र. ७. अनाथ प्रमाणपत्र वितरीत करण्याची प्रक्रिया मधील मुद्दा क्र. २ मध्ये**

“आयुक्त, महिला व बाल विकास यांच्या मार्फत अनाथ प्रमाणपत्रासाठी एक संकेतांक विकसीत करण्यात यावा. सर्वसाधारणपणे ज्यामध्ये पहिली दोन अक्षरे (MH), महाराष्ट्र राज्य, पुढील दोन अक्षरे ज्या जिल्ह्यातील CWC / JJB आदेशान्वये बालक बालगृहात दाखल झाले आहे ते दर्शविल. संकेतामधील शेवटचा अंक हा अनाथ प्रमाणपत्राचा अनुक्रमांक दर्शविल.

उदा. अहमदनगर (AH) तर पुढील अक्षर (N) हे (NGO) साठी व (G) हे शासकिय बालगृहासाठी दर्शविल. तसेच जिल्ह्यात एकापेक्षा जास्त बाल कल्याण समिती, अस्तित्वात असतील तर १,२,३, असे नमूद करण्यात यावे. कधीही संस्थेत दाखल नसलेल्या बालकांच्या अनाथ प्रमाणपत्रामध्ये (N) आणि (G) ऐवजी (O) असा संकेतांक नमूद करावा.”

ऐवजी

“अनाथ प्रमाणपत्रांसाठी पुढ़ीलप्रमाणे संकेतांक विहीत करण्यात येत आहे. यामध्ये पहिली दोन अक्षरे महाराष्ट्र राज्य/ पुढील तीन अक्षरे जिल्ह्याची आद्याक्षरे/ ज्या जिल्ह्यातील बाल कल्याण समितीच्या आदेशान्वये बालक बालगृहात दाखल झाले आहे किंवा अन्याथ प्रमाणपत्रासाठी पात्र आहे हे घोषित केले असेल ती बाल कल्याण समिती/ पुढील अक्षर बालगृहाचा प्रकार {अक्षर (N) हे (NGO) साठी व (G) हे शासकिय बालगृहासाठी व (O) हे कधीही संस्थेत दाखल नसलेल्या बालकांसाठी) / संकेतामधील शेवटचे चार अंक हे अनाथ प्रमाणपत्राचा अनुक्रमांक दर्शवतील.

उदा. पुणे जिल्ह्यातील बाल कल्याण समिती क्र. २ च्या आदेशान्वये मान्यताप्राप्त खाजगी बाल गृहामध्ये दाखल करण्यात आलेल्या ९८व्या बालकाच्या प्रमाणपत्राचा सांकेतांक हा MH/PUN/CWC२/N/००९८ असा असेल."

असे वाचावे.

९. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०२१११२६१५०६०१८६३० असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Khadija Farooque Naikwade

Digitally signed by Khadija Farooque Naikwade
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=WOMEN AND CHILD DEVELOPMENT DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8cd35f5dfe17a9e9a0cd531b6bb11d782183e791bc817e7a736def213ac7d71b, pseudonym=97FCB88BB2290D50D7776C4E6535999B94A26921, serialNumber=6F53F8BF0DEB07218B68698BE9E71A15840F8812D6E796D1509 3EAEC9A19F0DF, cn=Khadija Farooque Naikwade
Date: 2021.11.26 15:10:53 +05'30'

**( ख. फा. नाईकवाडे )**

**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा.उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा.अध्यक्ष/उपाध्यक्ष/ सदस्य, विधानसभा/ विधानपरिषद, विधानमंडळ, मुंबई
५. मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा/ विधानपरिषद, महाराष्ट्र राज्य, मुंबई
६. मा.मंत्री, नियोजन/ वित्त विभाग यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
७. मा.मंत्री/ राज्यमंत्री, महिला व बाल विकास यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
८. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
९. सर्व विभागांचे अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालय, मुंबई
१०. प्रधान सचिव, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
११. आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे
१२. आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई
१३. सर्व जिल्हाधिकारी
१४. महालेखापाल- महाराष्ट्र-१/२ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई / नागपूर
१५. महालेखापाल- महाराष्ट्र-१/२ (लेखा परिक्षा), मुंबई / नागपूर
१६. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
१७. उपायुक्त (महिला विकास)/ (बाल विकास), महिला व बाल विकास आयुक्तालय,पुणे
१८. सर्व विभागीय उप आयुक्त, महिला व बाल विकास (आयुक्तालयामार्फत)
१९. सर्व जिल्हा महिला व व बाल विकास अधिकारी (आयुक्तालयामार्फत)
२०. सर्व कार्यासने, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
२१. निवड नस्ती, का-०३.

अनाथांच्या १% आरक्षणाच्या
धोरणात बदल करणेबाबत

**महाराष्ट्र शासन**
**महिला व बाल विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांक- अनाथ-२०१८/प्र.क्र.१८२/का-०३**
नविन प्रशासन भवन, तिसरा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक- २३ ऑगस्ट, २०२१.

**वाचा :-**

१) शासन निर्णय,महिला व बाल विकास विभाग, क्र.संकीर्ण-२०१३/प्र.क्र.१०९/का.०३, दि.०६.०६.२०१६.
२) शासन निर्णय,महिला व बाल विकास विभाग, क्र.अमुजा-२०११/प्र.क्र.२१२/का.०३, दि.०२.०४.२०१८.
३) शासन परिपत्रक,महिला व बाल विकास विभाग क्र.-अनाथ-२०१८/प्र.क्र.१८२/का.०३, दि.२०.८.२०१९.

**प्रस्तावना :-**

बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २०१५ अन्वये काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या अनाथ, निराधार बालकांना पोलीस, स्वयंसेवी संस्था, पालक यांचेकडून बाल कल्याण समितीमार्फत बालगृहात प्रवेश दिला जातो. ० ते १८ वयोगटातील अशा मुलांना बालगृहामध्ये अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य सुविधा, शिक्षण, प्रशिक्षण इत्यादी सुविधा पुरविल्या जातात व पुनर्वसनासाठी प्रयत्न केले जातात. अनाथ मुलांना त्यांचा संस्थेतील कालावधी संपल्यानंतर संस्थेच्या बाहेर पडल्यानंतर अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. अनाथ मुलांची जात नक्की माहिती नसल्याने, त्यांना कोणत्या एका विशिष्ट प्रवर्गात समाविष्ट करता येत नाही. जातीचा दाखला नसल्यामुळे, त्यांना विविध शासकीय लाभापासून वंचित रहावे लागते. त्यामुळे त्यांच्या भावी आयुष्यात अनेक अडचणी निर्माण होतात. अनाथ मुलांकडे कोणतीही कागदपत्रे व पुरावे नसल्यामुळे, त्यांना जातीचे प्रमाणपत्र मिळत नाही व त्यामुळे त्यांना विविध शासकीय सवलतींपासून वंचित रहावे लागते. त्यामुळे अनाथ मुलांना राज्य शासनाच्या विविध सवलतींचा लाभ घेता यावा, याकरीता आरक्षण लागू करणेबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. त्यानुसार दिनांक १७ जानेवारी, २०१८ रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीतील निर्णयानुसार वाचा क्र.२ च्या शासन निर्णयान्वये, अनाथ मुलांना खुल्या प्रवर्गातून शिक्षण व नोकरी यामध्ये १% समांतर आरक्षण लागू करण्यात आले आहे.तर वाचा क्र.३ नुसार अनाथ आरक्षणाच्या अनुषंगाने मार्गदर्शक सूचना निर्गमीत करण्यात आलेल्या आहेत.

२. अनाथ आरक्षणासंबंधीत संदर्भीय क्र. २ येथील दि. २/०४/२०१८ च्या शासन निर्णयात नमूद अनाथांच्या व्याख्येत बदल करण्याबाबत तसेच अनाथांची तीन प्रकारांमध्ये वर्गवारी करणेबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. त्यानुसार सुधारित प्रस्ताव सामान्य प्रशासन विभागास सादर करण्यात आला होता. अनाथ आरक्षण या विषयाच्या अनुषंगाने अनाथांना खुल्या प्रवर्गातून १% आरक्षण लागू करण्याऐवजी त्यांना दिव्यांगांच्या धर्तीवर १% आरक्षण निश्चित करणेबाबत सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी सुचित केले होते. त्यानुसार अनाथांना १% आरक्षण लागू करणे, अनाथांच्या व्याख्येमध्ये बदल करणे,अनाथांची तीन प्रकारामध्ये वर्गवारी करणे, अनाथ प्रमाणपत्र नमून्यात बदल करणे व यानुषंगाने आरक्षणासंबंधीत उपरोक्त वाचा क्र.१ ते ३ मधील शासन निर्णय अधिक्रमीत करून एकच सर्वसमावेशक शासन निर्णय निर्गमीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २०१५ अन्वये काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या अनाथ, निराधार बालकांना संस्थेतून बाहेर पडल्यानंतर जातीचा दाखला नसल्यामुळे विविध शासकीय लाभांपासून वंचित रहावे लागते. त्यामुळे अनाथ मुलांना राज्य शासनाच्या विविध सवलतींचा लाभ घेता यावा याकरीता खालीलप्रमाणे वर्गीकृत अनाथांना शिक्षण व नोकरी यामध्ये १% आरक्षण लागू करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१) "अ" या प्रवर्गामध्ये पुर्णत: अनाथ असलेल्या बालकांचा, ज्यांच्या आई-वडील, भाऊ-बहीण, जवळचे नातेवाईक,गाव, तालुका,पत्ता याबाबत काहीही माहिती उपलब्ध नाही आणि त्या बालकांचे पालनपोषण बालकांच्या काळजीसाठी कार्यरत संस्थेत/ अनाथालयात झाले आहे, अशी बालके.

२) "ब" या प्रवर्गामध्ये ज्या मुलाचे आई-वडील यांचे निधन झालेले आहे तथापि, त्यांच्या नातेवाईकांबाबत माहिती उपलब्ध असून त्यांच्या कागदपत्रावर जातीचा उल्लेख करण्यात आलेला आहे आणि त्या बालकांचे पालनपोषण बालकांसाठी कार्यरत संस्थेत/ अनाथालयात झाले आहे, अशी बालके.

३) "क" या प्रवर्गामध्ये ज्या मुलाचे आई-वडील यांचे निधन झाले आहे परंतू त्या मुलाचे इतर नातेवाईक जिवंत असून बालकाचे संगोपन नातेवाईकांकडे झालेले असून बालकाच्या जातीबाबतचीही माहिती उपलब्ध आहे, अशी बालके.

**२. अटी व शर्ती/ कार्यपध्दती :-**

१) महिला व बाल विकास विभागाकडून ज्या अनाथ मुलांना अनाथ प्रमाणपत्र देण्यात आलेली आहेत अशी बालके आरक्षणासाठी पात्र राहतील. तथापि, ज्या अनाथ मुलाच्या आई-वडीलांचे निधन त्या मुलाच्या वयाची १८ वर्ष पुर्ण होण्यापुर्वी झाले असेल अशाच बालकांना आरक्षण अनुज्ञेय राहील.

२) अनाथ आरक्षणाची अंमलबजावणी दिव्यांगांच्या आरक्षणाप्रमाणे करण्यात येईल.

३) पदभरती तसेच शैक्षणिक, वसतिगृहे व व्यावसायिक शिक्षण प्रवेशासाठी अनाथ आरक्षण लागू राहील.

४) अनाथ पदाची गणना पदभरतीच्या तसेच शैक्षणिक प्रवेशासाठी उपलब्ध पदसंख्येच्या १% राहील.

५) पदभरती अथवा शैक्षणिक प्रवेशासाठीची अनाथ आरक्षणाची पदे खुला किंवा सामाजिक आरक्षण प्रवर्गात दर्शविण्यात येऊ नयेत.

६) अनाथांसाठी आरक्षित पदावर गुणवत्तेनुसार निवड झालेल्या उमेदवारांचा समावेश तो ज्या प्रवर्गाचा आहे त्या प्रवर्गात करण्यात येईल.

७) भरती वर्षात पात्र अनाथ उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर आरक्षित जागेचा अनुशेष पुढील भरती वर्षासाठी ओढण्यात येईल. जर पुढील भरती वर्षातही पात्र अनाथ उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर पद अनाथांव्यतिरिक्त इतर उमेदवारांमधून गुणवत्तेनुसार भरण्यात येईल.

८) अनाथ आरक्षणाचा लाभ घेऊन शासन सेवेत रूजू होणाऱ्या उमेदवाराला अनाथ प्रमाणपत्र पडताळणीच्या अधीन राहून तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती देण्यात येईल. नियुक्ती पश्चात ६ महिन्याच्या कालावधीत अनाथ प्रमाणपत्राची पडताळणी करुन घेण्याची जबाबदारी संबंधित नियुक्ती प्राधिकारी/ विभाग प्रमुख व आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे यांची राहील.

९) अनाथांसाठीचे आरक्षण हा शासन निर्णय लागू झाल्याच्या दिनांकापासून पुढे होणाऱ्या नोकरभरती व शैक्षणिक प्रवेशासाठी लागू राहील. तसेच दि. २.४.२०१८ नंतर ज्या पदभरतीचा अंतिम निकाल जाहीर करण्यात आलेला नसेल, अशा सर्व पदभरतींसाठी देखील प्रस्तावित आरक्षण लागू राहील.

१०) अनाथालयात दाखल करण्यात येणाऱ्या काही बालकांची जात माहित नसताना त्यांच्या शैक्षणिक प्रवेशासाठी अंदाजे जात नमूद केल्याचे निदर्शनास येते. अशा बालकांच्या जात प्रमाणपत्राची वैधता होऊ शकत नसल्यास सदर उमेदवारास पदभरती अथवा शैक्षणिक प्रवेशानंतर खुल्या प्रवर्गात दर्शविण्यात यावे.

११) सदर शासन निर्णय अंमलात येण्यापूर्वी ज्या पात्र अनाथ मुलांना (दोन्ही पालक नसलेली) महिला व बाल विकास विभागामार्फत अनाथ प्रमाणपत्राचे वितरण करण्यात आलेले असेल अशा मुलांची प्रमाणपत्रे आरक्षणासाठी पात्र राहतील. तथापि, प्रस्तुत शासन निर्णय निर्गमीत झाल्यानंतर ज्या अनाथांना शासन निर्णय , महिला व बाल विकास विभाग, दिनांक ६.६.२०१६ मध्ये विहित केलेल्या नमुन्यानुसार प्रमाणपत्र वितरीत करण्यात आलेले आहे अशा मुलांना सुधारीत नमुन्यात “अ”, “ब” आणि “क” या प्रवर्गात वर्गवारी करून सुधारीत प्रमाणपत्र वितरीत करण्याची कार्यवाही संबंधीत विभागीय उपायुक्त महिला व बाल विकास विभाग यांनी एका महिन्याच्या आत पुर्ण करावी.नवीन नमुन्यानुसार प्रमाणपत्र वितरीत करतांना संबंधीत अनाथ मुलाकडून कोणतीही नवीन कागदपत्रांची मागणी करण्यात येवू नये. विभागीय कार्यालयाकडे उपलब्ध अभिलेखाच्या आधारे त्या मुलाची वर्गवारी करून सुधारीत प्रमाणपत्र निर्गमीत करणे बंधनकारक राहील.

१२) अनाथ आरक्षणाच्या अनुषंगाने अभिनिर्णय देण्यास महिला व बाल विकास विभाग सक्षम राहील.

## ३. अनाथ आरक्षणाच्या अंमलबजावणीसाठी मार्गदर्शक सूचना:-

१) अनाथ आरक्षणासाठी अर्ज करणा-या उमेदवारास अनुसुचित जाती या प्रवर्गासाठी निश्चित केलेले वय, शैक्षणिक शुल्क, परीक्षा शुल्क, किमान गुणवत्ता पात्रता इत्यादी निकष लागू राहतील.

२) अनाथ आरक्षणासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवाराने महाराष्ट्र राज्याचा रहिवासी दाखला (Domicile) सादर करणे बंधनकारक राहील.

३) आरक्षणाच्या अनुषंगाने सामान्य प्रशासन विभागाने वेळोवेळी निश्चित केलेले निकष व अटी अनाथ आरक्षणास लागू राहतील.

४) अनाथ आरक्षणासाठी अर्ज करणारा उमेदवार संबंधित पदाच्या सेवा प्रवेश नियमातील तरतूदीनुसार पदासाठी आवश्यक असणारी किमान शैक्षणिक व इतर अर्हता प्राप्त करणारा असावा.

५) अनाथ आरक्षण लागू करताना शासन निर्णयातील तरतूदींचे काटेकोरपणे पालन करण्याची जबाबदारी संबंधीत प्राधिकरणाची राहील.

## ४.अनाथ प्रमाणपत्रासाठी आवश्यक कागदपत्रे/निकष :-

१) "अ" व "ब" प्रवर्गामध्ये समावेश होणा-या अनाथांच्या आई-वडीलांचा शोध घेवून, त्यापैकी कोणीही हयात नसल्याबाबतची संबंधित यंत्रणेकडून खात्री केल्याचे संस्थेचे अधिक्षक यांचे प्रमाणपत्र जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांनी प्रमाणित करावे. (त्यासाठी संस्थेचे अधिक्षक यांनी जन्म-मृत्यू नोंद रजिस्टर, शाळा सोडल्याचा दाखला, प्रवेश निर्गम रजिस्टरची प्रत, गृह चौकशी अहवाल, बाल कल्याण समिती/बाल न्याय मंडळाचे आदेश यापैकी एक ग्राह्य धरावे.)

२) "क" प्रवर्गात येणा-या अनाथांचे आई-वडील हयात नसलेबाबत ग्रामसेवक/मुख्याधिकारी/वार्ड अधिकारी किंवा इतर सक्षम अधिकारी यांचेकडून मिळालेला मृत्यु दाखला किंवा तत्सम कागदपत्रे जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांनी विचारात घेवून तो अनाथ असल्याचे प्रमाणित करावे.

## ५. "अ" आणि "ब" प्रवर्गातील (संस्थेतील/ संस्थेतून बाहेर पडलेले) अनाथ मुलांसाठी प्रमाणपत्र प्राप्त करणेसाठी करावयाच्या अर्जाची कार्यपध्दती:-

१) अनाथ प्रमाणपत्रासाठीचे निकष पुर्ण करणाऱ्या अनाथ मुलाने सध्या वास्तव्यास असलेल्या किंवा अनाथ उमेदवार वयाच्या १८ वर्षानंतर संस्थेतून बाहेर पडले असतील अशा संस्थेच्या अधिक्षकाकडे अनाथ प्रमाणपत्र मिळण्यासंदर्भात अर्ज सादर करावा.

२) संबंधित संस्थेच्या अधीक्षकांनी त्या मुलाच्या अर्जावरून त्या मुलाने ज्या-ज्या संस्थेत वास्तव्य केले आहे अशा सर्व संबंधित संस्थेच्या अधीक्षकांकडून आवश्यकतेनुसार त्या मुलाची माहिती स्वतः उपलब्ध करावी.

३) संस्थेच्या अधिक्षकांनी मुलासंबंधीत माहिती व उपलब्ध कागदपत्रांच्या आधारे सदर मुलगा निकषानुसार अनाथ असल्याचे प्रमाणित करून जिल्हा महिला बाल विकास अधिकारी यांना प्रस्ताव सादर करावा.

४) जिल्हा महिला बाल विकास अधिकारी यांनी सदर प्राप्त अहवालाचे प्रमाणपत्र प्रमाणित करून अनाथ प्रमाणपत्र मिळणेबाबतचा प्रस्ताव स्वयंस्पष्ट अभिप्रायासह संबंधित जिल्ह्याच्या बाल कल्याण समितीस सादर करावा.

५) जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांचेकडून अनाथ प्रमाणपत्र देणेबाबतचा प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर बाल कल्याण समितीकडून सदर अर्जाची तपासणी करण्यात येईल व उपलब्ध कागदपत्रांच्या आधारे प्राप्त प्रस्तावाची छाननी करून सदर मुलाचे आई-वडील हयात नसल्याचे व निश्चित केलेल्या निकषासार तो अनाथ असल्याचे प्रमाणित करावे किंवा आवश्यकता असेल तरच पोलीस / महसूल विभागाच्या यंत्रणेकडून छाननी करुन तसेच गरजेनुसार मुलाखत घेऊन अर्ज प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून कमाल ४० दिवसात शिफारशीसह पुन:श्च संबंधित जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांच्याकडे सादर करणे बंधनकारक राहील.

६) जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांनी बाल कल्याण समितीकडून प्राप्त प्रस्ताव ७ दिवसात शिफारशीसह विभागीय उपायुक्त(महिला व बाल विकास) यांच्याकडे निर्णयार्थ पाठविणे बंधनकारक राहील.

७) जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांनी सादर केलेला प्रस्ताव /शिफारस विचारात घेऊन विभागीय उपायुक्त, महिला व बाल विकास यांचेकडून अनाथ प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही करण्यात यावी. तसेच शिफारस अमान्य करण्यात येऊन अनाथ प्रमाणपत्र नाकारण्यात आल्यास विभागीय उपायुक्त महिला व बाल विकास यांचेकडून कारणासहित सदर अर्ज जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांच्याकडे परत पाठविण्यात येईल.

**६."क" प्रवर्गातील (संस्थेत कधीही दाखल नसलेले) अनाथ मुलांसाठी प्रमाणपत्र प्राप्त कऱणेसाठी करावयाच्या अर्जाची कार्यपध्दती :-**

१) अनाथांच्या "क" प्रवर्गामध्ये येणा-या ज्या मुलाचे आई वडिल हयात नाहीत अशा मुलांच्या बाबतीत त्यांनी संबंधित जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांचेकडे अर्ज करणे आवश्यक राहील.

२) "क" प्रवर्गात येणा-या अनाथांचे आई-वडील हयात नसलेबाबत ग्रामसेवक/मुख्याधिकारी/वार्ड अधिकारी किंवा सक्षम अधिकारी यांचेकडून मिळालेला दाखला जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांनी तपासून प्रमाणित करावा.

३) जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांचेकडून संबंधित जिल्ह्याच्या बाल कल्याण समितीकडे सदर अर्ज पाठविण्यात येईल. बाल कल्याण समितीकडून सदर अर्जाची तपासणी करण्यात येईल व आवश्यकतेनुसार पोलीस / महसूल विभाग/ग्राम विकास विभागाच्या यंत्रणेकडून छाननी करुन तसेच मुलाखत घेऊन अर्ज प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून कमाल ४०

दिवसात शिफारस पुनःश्च संबंधित जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांच्याकडे सादर करणे बंधनकारक राहील.

४) जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांनी बाल कल्याण समितीकडून प्राप्त शिफारस ७ दिवसात विभागीय उपायुक्त(महिला व बाल विकास) यांच्याकडे निर्णयार्थ पाठविणे बंधनकारक राहील.

५) बाल कल्याण समितीची शिफारस विचारात घेऊन विभागीय उपायुक्त, महिला व बाल विकास यांचेकडून अनाथ प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही करण्यात यावी. तसेच शिफारस अमान्य करण्यात येऊन अनाथ प्रमाणपत्र नाकारण्यात आल्यास विभागीय उपायुक्त महिला व बाल विकास यांचेकडून कारणासहित सदर अर्ज जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांच्याकडे परत पाठविण्यात येईल.

**७. अनाथ प्रमाणपत्र वितरीत करण्याची प्रक्रिया :-**

१) जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी व बाल कल्याण समितीची शिफारस विचारात घेवून विभागीय उपायुक्त,महिला व बाल विकास यांनी चांगल्या प्रतिच्या कागदावर विहित करण्यात आलेल्या प्रपत्रातील नमुन्यानुसार छापील लेटर हेडवरती अनाथ प्रमाणपत्र स्वाक्षरी करुन वितरीत करावे.

२) आयुक्त, महिला व बाल विकास यांच्या मार्फत अनाथ प्रमाणपत्रासाठी एक संकेतांक विकसीत करण्यात यावा. सर्वसाधारणपणे ज्यामध्ये पहिली दोन अक्षरे (MH), महाराष्ट्र राज्य, पुढील दोन अक्षरे ज्या जिल्ह्यातील CWC / JJB आदेशान्वये बालक बालगृहात दाखल झाले आहे ते दर्शविल. संकेतामधील शेवटचा अंक हा अनाथ प्रमाणपत्राचा अनुक्रमांक दर्शविल.
उदा. अहमदनगर (AH) तर पुढील अक्षर (N) हे (NGO) साठी व (G) हे शासकिय बालगृहासाठी दर्शविल. तसेच जिल्ह्यात एकापेक्षा जास्त बाल कल्याण समिती, अस्तित्वात असतील तर १,२,३, असे नमूद करण्यात यावे. कधीही संस्थेत दाखल नसलेल्या बालकांच्या अनाथ प्रमाणपत्रामध्ये (N) आणि (G) ऐवजी (O) असा संकेतांक नमूद करावा.

३) विभागीय उपायुक्त यांनी वितरीत केलेल्या प्रमाणपत्राची एक प्रत आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे यांच्या अभिलेखासाठी उपलब्ध करावी.

४) अनाथ प्रमाणपत्राच्या अनुषंगाने जर कांही तक्रार असल्यास यासंदर्भात अपिलीय प्राधिकारी हे आयुक्त, महिला व बाल विकास हे राहतील.

**८. अनाथ मुलांची शैक्षणिक शुल्क प्रतिपुर्तीसाठी प्रक्रिया :-**

१) अनाथ मुलांच्या माध्यमिक व उच्च माध्यमिक शैक्षणिक शुल्काची संपूर्ण प्रतीपूर्ती तर उच्च शिक्षणासाठी (पदवी व पदव्युत्तर) शासकीय महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेणाऱ्या अनाथ मुलांच्या शैक्षणिक शुल्काची प्रतिपूर्ती महिला व बाल विकास विभागाच्या बाल न्याय निधीमधून करण्यात येईल.

२) अनाथ आरक्षणातून प्रवेश घेतलेल्या मुलांचे शैक्षणिक शुल्क प्रतिपुर्तीचे प्रस्ताव संबंधीत विद्यालये/महाविद्यालये/विद्यापीठ यांनी बाल न्याय निधी सदस्य सचिव तथा उपायुक्त(बाल विकास), महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे यांचेकडे सादर करावेत.

३) बाल न्याय निधी सदस्य सचिव तथा उपायुक्त (बाल विकास) यांना शैक्षणिक शुल्क प्रतिपुर्तीचे प्रस्ताव एकत्रितपणे वेळोवेळी प्रधान सचिव, महिला व बाल विकास यांचे अध्यक्षतेखाली गठीत बाल न्याय निधी व्यवस्थापन समितीसमोर सादर करावेत.

४) बाल न्याय निधी व्यवस्थापन समितीच्या मान्यतेनंतर शुल्क प्रतिपुर्तीची कार्यवाही बाल न्याय निधी सदस्य सचिव तथा उपायुक्त(बाल विकास), महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे यांनी संबंधीत विद्यालये/महाविद्यालये/विद्यापीठ यांना डिजीटल पध्दतीने करावी.

५) एखाद्या अनाथ प्रवेशिताने शैक्षणिक शुल्क संबंधीत विद्यालये/महाविद्यालये/विद्यापीठ यांना अदा केले असेल तर अशा वेळेस सदर प्रतिपुर्ती त्या विद्यार्थ्याला थेट डिजीटल पध्दतीने करण्यात यावी.

९. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०२१०८२३१६०३१०३८३० असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

VARUDKAR MAHESH ASHOKRAO

Digitally signed by VARUDKAR MAHESH ASHOKRAO
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=WOMEN AND CHILD DEVELOPMENT DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=d93c4961d98086877a4048296211d7af97ecfd40d7967c43d20b360d83ce0fa6, pseudonym=58C42BF9F3ABBB1C15CFBC42D0AA8503E42564DB, serialNumber=7EBBBC3712E8D459EF90BF7AAE4EA46E9CAEBDD50CFECDE2EE7CE0454FA0416A, cn=VARUDKAR MAHESH ASHOKRAO
Date: 2021.08.23 16:10:41 +05'30'

**( म.अ.वरुडकर )**

**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा.उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा.अध्यक्ष/उपाध्यक्ष/ सदस्य, विधानसभा/ विधानपरिषद, विधानमंडळ, मुंबई
५. मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा/ विधानपरिषद, महाराष्ट्र राज्य, मुंबई
६. मा.मंत्री, नियोजन/ वित्त विभाग यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
७. मा.मंत्री/ राज्यमंत्री, महिला व बाल विकास यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
८. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
९. सर्व विभागांचे अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालय, मुंबई
१०. प्रधान सचिव, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
११. आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे
१२. आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई
१३. सर्व जिल्हाधिकारी
१४. महालेखापाल- महाराष्ट्र-१/२ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई / नागपूर
१५. महालेखापाल- महाराष्ट्र-१/२ (लेखा परिक्षा), मुंबई / नागपूर
१६. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
१७. उपायुक्त (महिला विकास)/ (बाल विकास), महिला व बाल विकास आयुक्तालय,पुणे
१८. सर्व विभागीय उप आयुक्त, महिला व बाल विकास (आयुक्तालयामार्फत)
१९. सर्व जिल्हा महिला व व बाल विकास अधिकारी (आयुक्तालयामार्फत)
२०. सर्व कार्यासने, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
२१. निवड नस्ती, का-०३.

## प्रपत्र

## अनाथ प्रमाणपत्र

**विभागीय उपायुक्त (महिला व बाल विकास) यांचे कार्यालय -**

**विभागाचे नाव-**

**संदर्भ-** १.शासन निर्णय, महिला व बाल विकास विभाग, क्र....................दिनांक............................

२.बाल कल्याण समिती................यांचे पत्र क्र............दिनांक ........अन्वये केलेली शिफारस.

३.जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांचे पत्र क्र............दिनांक ........अन्वये केलेली शिफारस.

..........................................................................................................................................

**संकेतांक क्रमांक ....................**

नवीन फोटो

**विभागीय उपायुक्त कार्यालयाचा**

**गोल शिक्का**

**नाव :-**

**१) "अ" प्रवर्गातील अनाथ मुलांसाठी "अनाथ" असल्याचे प्रमाणपत्र.**

प्रमाणित करण्यात येते की, प्रवेशित नामे ---------------------------- वय वर्षे -------------- अंदाजित जन्मदिनांक ------------- हा दिनांक --------------- पासून --------------- संस्था, मु. पो. --- ------------- ता. ------------------ जिल्हा -------------------- या शासनमान्य स्वयंसेवी/ शासकीय बालगृहात त्या संस्थेतील प्रवेशित रजिस्टरमधील नोंदणी क्रमांक --------------- नुसार दाखल झालेला ---- -------------- मुलगा / मुलगी अनाथ आहे.

संस्थेत दाखल होण्याची पार्श्वभूमी :- (वर्णन द्यावे)-------------------------------------------

----------------------------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------.

प्रवेशित नामे..............................याच्या/हिच्या आई वडिलांचा ठाव ठिकाणा सर्व मार्गांचा अवलंब करूनही अद्याप लागलेला नाही किंवा लागण्याची शक्यता नाही. संबंधित प्रवेशित हा अनाथ असल्याचे प्रमाणित करीत आहे. तसेच त्याच्या जातीबाबत कोणतेही कागदपत्र उपलब्ध नाही, असेही प्रमाणित करण्यात येत आहे.

**२) "ब" प्रवर्गातील अनाथ मुलांसाठी "अनाथ" असल्याचे प्रमाणपत्र.**

प्रमाणित करण्यात येते की, प्रवेशित नामे ---------------------------- वय वर्षे -------------- अंदाजित जन्मदिनांक ------------- हा दिनांक --------------- पासून --------------- संस्था, मु. पो. --- ------------- ता. ------------------ जिल्हा -------------------- या शासनमान्य स्वयंसेवी/ शासकीय बालगृहात त्या संस्थेतील प्रवेशित रजिस्टरमधील नोंदणी क्रमांक --------------- नुसार दाखल झालेला ---- -------------- मुलगा / मुलगी अनाथ आहे.संस्थेत दाखल होण्याची पार्श्वभूमी :- (वर्णन द्यावे)---------------

----------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------------

-------------------------

प्रवेशित नामे..............................याच्या/हिच्या (नांव व पत्ता) --------------- या नातेवाईकाचा शोध लागलेला असून, त्याचे प्रवेशिताशी नाते ------------ असे आहे. नातेवाईकाशी जात --------------------- असल्याने, प्रवेशितांची जात --------------- असल्याचे प्रमाणित करण्यात येत आहे. तसेच संबंधित प्रवेशित हा अनाथ (आई वडील नसलेला) असल्याचे प्रमाणित करण्यात येत आहे

**३) "क" प्रवर्गातील मुलासाठी अनाथ असल्याचे प्रमाणपत्र.**

प्रमाणित करण्यात येते की, अर्जदार नामे ----------------------------- वय वर्षे --------------- जन्म दिनांक ------------- हा /ही महिला व बाल विकास विभागांतर्गत कार्यरत असणा-या संस्थेमध्ये कधीही दाखल नव्हती. ................ याचे/हिचे आई वडील मयत आहेत तथापि याचे /हिचे कागदपत्रावर ................जातीचा उल्लेख कऱण्यात आलेला आहे......................याचे/हिचे इतर नातेवाईक जिवंत असून त्याचे नातेवाईंकांकडे संगोपन झालेले आहे. नातेवाईकाची जात .............असल्याने अर्जदाराची जात................असल्याचे प्रमाणित कऱण्यात येत आहे. तसेच संबंधीत अर्जदार अनाथ असल्याचे (आई वडील नसलेला) असल्याचे प्रमाणित करण्यात येत आहे.

( अनाथ प्रमाणपत्र वितरीत करताना अनाथ मुलगा ज्या प्रवर्गातील ("अ", "ब" आणि "क") असेल त्यासंबंधीत नमुन्याचा वापर करण्यात यावा.)

त्याचे भविष्य उज्ज्वल व्हावे, ही शुभेच्छा.

(गोल शिक्का)

स्वाक्षरी /-

नाव-

विभागीय उपायुक्त,महिला व बाल विकास,

............................विभाग.